| CNR-MHCH030057122016 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | २५/१०/२०१६ |
| | नोंद तारीख | : | २५/१०/२०१६ |
| | निकाल तारीख | : | १३/०८/२०२६ |
| | कालावधी | : | ०९ व. ०९ म. १९ दि. |

**विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.४), चंद्रपूर यांचे न्यायालयात**

**( पिठासिन अधिकारी – शिवाजी आर. गुळवे )**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३९२७/२०१६** **निशाणी क्र. ४३**

**गुन्हा नोंद क्र. २०५/२०१६**

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | | महाराष्ट्र शासन मार्फत,<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे, पडोली,<br>ता. व जि. चंद्रपूर. |
| अभियोग पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. जे. खोब्रागडे |
| आरोपी | १. | **सतेंद्र मुनेश्वर शर्मा,**<br>वयः ६५ वर्ष, कामधंदाः मजुरी, |
| | २. | **धनंजय सतेंद्र शर्मा,**<br>वयः २८ वर्ष, कामधंदाः मजुरी, |
| | ३. | **संतोष उर्फ छोटू राजदेव शर्मा,**<br>वयः २३ वर्ष, कामधंदाः मजुरी,<br>सर्व राहणार – जुनी पडोली,<br>ता.– चंद्रपूर, जिल्हा – चंद्रपूर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री. सी. आर. पांडे |

**भाग – ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २१/०८/२०१६ |
| फिर्याद दाखल दिनांक | २२/०८/२०१६ |
| दोषारोप दाखल केल्याचा दिनांक | २५/१०/२०१६ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २४/०९/२०१९ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | --- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३. | सतेंद्र मुनेश्वर शर्मा<br>धनंजय सतेंद्र शर्मा<br>संतोष उर्फ छोटु राजदेव शर्मा | २२/०८/२०१६ | २६/१०/२०१६ | भा. दं. वी. चे कलम २९४, ३२४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. | -- | -- |

## <u>भाग – क</u>

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**<u>अ. अभियोग पक्ष</u>**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | संजय सत्येंद्र शर्मा | फिर्यादी | ४० |

**<u>अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)</u>**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ४१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ४२ | वैद्यकिय प्रमाणपत्र |

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक १३ ऑगस्ट, २०२६ रोजी)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम २९४, ३२४, ५०६ सह कलम ३४ अन्वये असलेला दोषारोप सिध्दतेसाठी चालविण्यात आला आहे.

### अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

**०२.** दिनांक २१/०८/२०१६ रोजी रात्री ०९.०० वाजता आरोपींनी फिर्यादीला ''तु यहा रहना नही, साले मादरचोद तेरा यहा क्या है'' असे म्हणून शिवीगाळ केली. तसेच आरोपींनी त्याला ''तु यहा रहा तो तेरे को देख लुंगा'' असे म्हणून मारण्याची धमकी दिली. फिर्यादीने त्यांना विरोध केला असता आरोपी क्र.१ ने त्याला पकडून ठेवले व आरोपी क्र.२ ने लोखंडी पेचकसने त्याचे डोक्यावर मारले. आरोपींनी त्याला शिवीगाळ करून मारहाण केली. त्यामुळे, फिर्यादीने पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला.

**०३.** सदर रिपोर्टवरुन दखलपात्र अपराध घडल्याचे निर्दशनास आल्यामुळे पहिली खबर क्रमांक २०५/२०१६ भारतीय दंड विधान कलम २९४, ३२४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदविण्यात आली. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री. संतोष उपरे, पोलीस स्टेशन पडोली यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यांनी अन्वेषना दरम्यान घटनास्थळी जाऊन दोन पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामे केले व साक्षीदारांचे बयाण नोंदविले. अन्वेषन पुर्ण केल्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहिता (यानंतर 'फौ.प्र.सं.') चे कलम १७३(२) अन्वये अंतिम अहवाल दाखल करण्यात आले.

०४. आरोपींविरूद्ध निशाणी २७ वर दोषारोप नोंदविण्यात आले. सदरचा दोषारोप आरोपींना त्यांच्या बोलीभाषेतुन समजावुन सांगण्यात आले. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

०५. संपरिक्षेदरम्यान अभियोग पक्षातर्फे फिर्यादी सा.क्र.१ संजय सतेंद्र शर्मा याची साक्ष नोंदवण्यात आली. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास पुष्टी देणारी साक्ष न दिल्याने तपास अधिकारी किंवा इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध पुराव्याचे स्वरुप तसेच फिर्यादीने आपसात प्रकरण मिटविल्याची बाब विचारात घेऊन तसा नि.क्र.१ खाली आदेश पारीत करण्यात आला.

०६. अभिलेखावर आरोपींविरूद्ध कोणताही पुरावा आलेला नसल्यामुळे त्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये तपासण्यात आलेले नाही.

०७. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अधिवक्ता श्री. आर. जे. खोब्रागडे व आरोपींतर्फे श्री. सी. आर. पांडे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

०८. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. निर्णीतीसाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व निष्कर्षाची कारणमिमांसा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २१/०८/२०१६ रोजी २१.०० वाजताचे दरम्यान जुनी पडोली, ता. व जि. चंद्रपूर येथे आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीला अश्लील भाषेत शिवीगाळ केली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही |

| | | |
|---|---|---|
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करून लोखंडी पेचकसने फिर्यादीचे डोक्यावर मारहाण करून ईच्छापुर्वक दुखापत पोहोचविली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही |
| ३. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा करून मारण्याची धमकी दिली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही |
| ४. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते |

## <u>का र ण मि मां सा</u>

०९. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी ''आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी अश्लील शिवीगाळ करून लोखंडी पेचकसने त्याचे डोक्यावर मारहाण करून ईच्छापुर्वक दुखापत पोहोचविली तसेच मारण्याची धमकी दिली'' या बाबी सिध्द केल्या आहे किंवा कसे हे पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

## <u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u>

१०. उपरोक्त तिन्ही मुद्दे हे ऐकमेकांशी संबंधित असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे चर्चेकरिता घेतले आहेत.

११. अभियोग पक्षाने साक्षीदारांचा पुरावा नोंदविण्यापूर्वी यातील उभय पक्षाने आपसात तडजोड करण्याकरीता विनंती केली. सदरचा खटला हा फौजदारी प्रकिया संहिता कलम ३२० नुसार तडजोडपात्र नसल्यामुळे तडजोडीची परवानगी नाकारण्यात आली.

प्रस्तुतचा खटला उभय पक्षाने त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर सामोपचाराने मिटले असलेबाबत पुरसीस नि.क्र.३९ वर दाखल केली आहे.

**१२.** अभियोग पक्षाने आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरिता फिर्यादी सा.क्र.१ संजय याची साक्ष नोंदविलेली आहे. त्याने त्याच्या साक्षीत असे कथन केले आहे की, घटनेच्या दिवशी आरोपी व त्याचेमध्ये किरकोळ स्वरूपाचे शाब्दीक वाद झाले होते. या व्यतिरिक्त काहीही झाले नव्हते. त्याने पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता. परंतु रिपोर्टमधील मजकूर माहित नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदार हा प्रकरणास सुसंगत साक्ष देत नसल्याने त्याला भारतीय पुरावा अधिनियमाचे कलम १५४ प्रमाणे सूचक प्रश्न विचारण्यात आले. त्यामध्ये साक्षीदाराने आरोपी व त्याच्यामध्ये आपसी समझोता झाल्याचे मान्य केले आहे. घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी अश्लील शिवीगाळ करून लोखंडी पेचकसने त्याचे डोक्यावर मारहाण करून ईच्छापुर्वक दुखापत पोहोचविली तसेच मारण्याची धमकी दिली, हे स्पष्टपणे नाकारले आहे. त्यामुळे आरोपींना गुन्ह्यामध्ये गोवण्याइतपत पुरावा अभियोग पक्षाला अभिलेखावर आणता आलेला नाही. आरोपींनी घटनास्थळ पंचनामा व वैद्यकिय प्रमाणपत्र मान्य केलेले आहेत, परंतु साक्षीदाराने घटनास्थळाबाबत व त्याला झालेल्या जखमांबाबत काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे त्याचा फायदा अभियोग पक्षाला होत नाही.

**१३.** फिर्यादीने न्यायालयात पुरसीस (नि.क्र.३९) द्वारे कळविले की, त्यांचेमध्ये आपसात समझोता झालेला असून, तिला आरोपींविरूद्ध प्रस्तुत खटला चालवायचा नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणातील गुन्हा फौजदारी प्रकिया संहिता कलम ३२०(१)(२) मध्ये आपसात मिटविण्यासारखे नाही. परंतु, दोन्ही पक्षामधील संबंध चांगले व सलोख्याचे रहावे

म्हणुन दोन्ही पक्षांनी आपआपसात तडजोड केल्याचे दिसते. त्यामुळे फिर्यादीने खोटा साक्षीपुरावा दिला असे म्हणत त्याचे विरुध्द फौजदारी प्रकिया संहिता कलम ३४४ किंवा ३४० प्रमाणे कोणतीही कार्यवाही करणे योग्य होणार नाही. फिर्यादीने हे मान्य केले आहे की, त्याने आरोपींसोबत प्रकरण आपसात मिटवलेले आहे, याच कारणामुळे सरकारी अभियोक्ता किंवा अभियोग पक्षाने पुढे कोणतेही साक्षीदार तपासले नाही.

**१४.** साक्षीदाराने दिलेल्या मौखिक साक्षीचे अवलोकन केले असता साक्षीदार क्र.१ संजय याने आरोपींविरुध्द फिर्याद दिली होती, असे पुराव्यामध्ये कथन केले आहे. फिर्यादीने कथन केल्याप्रमाणे व पुरसिस (नि.क्र.३९) प्रमाणे त्याला आरोपींविरूद्ध खटला पुढे चालवायचा नाही. प्रस्तुत प्रकरणात समझोता झालेला असल्याने अभियोग पक्षाने देखील प्रस्तुत साक्षीदारा व्यतिरीक्त इतर साक्षिदारांची साक्ष नोंदविलेली नाही. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्याइतपत पुरावा न्यायालया समोर आलेला नाही. त्यामुळे उपलब्ध असलेल्या साक्षी पुराव्यावरून घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी अश्लील शिवीगाळ करून लोखंडी पेचकसने त्याचे डोक्यावर मारहाण करून ईच्छापुर्वक दुखापत पोहोचविली तसेच मारण्याची धमकी दिली, हे आवश्यक घटक सर्व शंकांच्या पलीकडे जाऊन सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, उपलब्ध असलेल्या पुराव्याआधारे तसेच उभय पक्षांमधील झालेला समझोता या बाबींचा विचार करता आरोपी विरोधात निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>**

**१५.** मुद्दा क्र. १ ते ३ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरून आरोपी निर्दोष

सुटण्यास पात्र आहेत. अभिलेखाचे अवलोकन केले असता एक लोखंडी पेचकस जप्त असल्याचे दिसून येते. सदरचा पेचकस मुल्यहिन असल्यामुळे आवाहनाचा कालावधी संपल्यानंतर तो नष्ट करणे योग्य व न्यायोचित होईल. आरोपींना फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता प्रतीभुतीसह जमानतपत्र देण्याचे निर्देश देण्यात येत आहे. म्हणून मी मुद्दा क्र. ४ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

**१.** आरोपी क्र.१ सतेंद्र मुनेश्वर शर्मा, आरोपी क्र.२ धनंजय सतेंद्र शर्मा व आरोपी क्र.३ संतोष उर्फ छोटु राजदेव शर्मा यांची भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२४, ५०६ सह कलम ३४ अन्वयेच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपींचे जात मुचलके व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहे.

**३.** जप्त मुद्देमाला एक लोखंडी पेसकस हा आवाहनाचा कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावा.

**४.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ प्रमाणे सदर न्यायनिर्णयाविरूद्ध अपिल दाखल झाल्यास अपील न्यायालयासमोर उपस्थीत होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता प्रत्येकी रक्कम रुपये ५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

**(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.**)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHIVAJI RADHU GULAVE
Date: 2026.08.13 16:23:30 +0530

**(शिवाजी आर. गुळवे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.४), चंद्रपूर

स्थळ :– चंद्रपूर
दिनांक :– १३/०८/२०२६

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. करून अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | सुचिता शै. राऊत, लघुलेखक श्रेणी–३. |
| न्यायालयाचे नांव | : | न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, (कोर्ट क्र.४) चंद्रपूर. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | १३/०८/२०२६ |